# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

पत्र पेटी क्र -५१६ औरंगाबाद - ४३१ ००५

(0240)2334216(P) 2334769(O) Fax-2356820

**http://www.dteau.org    roaurangabad.dte@gmail.com**

आयएसओ ९००१-२००८ मान्यता प्राप्त


जाक्रं विकाऔ/शिक्षण/२०१०/ ६९६६

दिनांक : 16 OCT 2010

प्रति

प्राचार्य

शासकीय/अनुदानित/विना-अनुदानित

अभियांत्रिकी/औषधनिर्माण/आर्किटेक्चर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्था

अभियांत्रिकी/औषधनिर्माण/एचएमसीटि अभ्यासक्रमांच्या पदविका संस्था

एमबीए/एमसीए इ.पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्था

विषय : व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या मागासवर्गीय विदयार्थ्यांचे जात वैधता प्रमाणपत्राबाबत.

संदर्भ : मा.संचालक तंत्रशिक्षण संचालनालय म.रा.मुंबई यांचे पत्र क्रं २अ/एडिएम/जात-वैधता २०१०/२९१९ दिनांक २० सप्टेंबर २०१०.

उपरोक्त विषयाबाबतचे समाज कल्याण संचालनालयाचे पत्र क्रं.सकसं/जाप्रप/व्यव.अभ्यासक्रम/७८९/जावैप्रमाणपत्र/२०१०-११/का-२ स.क.स.दिनांक ३०.८.२०१० चे पत्र या सोबत माहितीस्तव जोडले आहे. सदर पत्राच्या अनुषंगाने आपल्या संस्थेत प्रवेशित मागासवर्गीय विदयार्थ्यांच्या जात प्रमाणपत्र वैधता बाबतची कार्यवाही करावी.

सोबत : परिपत्रक

सहसंचालक

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,औरंगाबाद.

प्रत : या कार्यालयाच्या प्रोग्रॅमर यांना कार्यालयाच्या वेबसाईटवर IMP circular regarding Cast validity या शिर्षाखाली प्रसिध्दिसह

क्र.सकसं/जाप्रप/व्यव.अभ्यासक्रम/ ६८८
जावैप्रमाणपत्र/२०१०-२०११/का-२/
समाज कल्याण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, पुणे १
दिनांक : ३० ऑगस्ट २०१०

प्रति,
संचालक,
तंत्र शिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य,
मुंबई - ४००००१

**विषय :** व्यवसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे जात वैधता प्रमाणपत्राबाबत.

**संदर्भ :** १. शासनपरिपत्रक क्र. इबीसी-२००८/प्र.क्र.१३८/मावक-२,दिनांक ५/१२/२००८
२. शासन परिपत्रक क्र.सीबीसी-१२/२०००/प्र.क्र.४२७/मावक-५, दि.३१/७/२००८
३. मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे दि. १५ जून २००६ चे रिट याचिका क्रमांक १३५०/२००६ दिपिका योगेश्वर नंदनवार वि.महाराष्ट्र शासन, यामधील आदेश

उपरोक्त विषयांकित संदर्भीय पत्रान्वये कळविण्यात येते की, शासन मान्यताप्राप्त विना अनुदानित व कायम विना अनुदानित संस्थामध्ये व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क समितीने निश्चित केलेल्या दरानुसार शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती करण्याच्या योजनेचा लाभ घेणा-या विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. तथापी भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत लाभ घेणा-या मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडून जात वैधता प्रमाणपत्र घेण्याची सक्ती करण्यात येवू नये असे कळविलेले आहे.

संदर्भ क्र.२ च्या शासन परिपत्रकानुसार व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेणा-या मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या जाती दाव्यांची पडताळणीचे प्रस्ताव संबंधित शैक्षणिक संस्थेने त्यांच्या कार्यकक्षेतील विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे पाठवावेत. व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी संबंधीत शैक्षणिक संस्थेकडे प्रवेश घेतलेपासून एक (१) महिन्याचे आत आवश्यक त्या कागदपत्रांसह परिपूर्ण प्रस्ताव सादर करणे आवश्यक राहील. शैक्षणिक संस्थेने असे प्रस्ताव प्राप्त झालेपासून आठ (८) दिवसाच्या आत संबंधीत जिल्ह्याचे विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांचेकडे

Bhosale letter 11

२२९५

२९९९१
३/९/१०

पाठवावेत व त्यानंतर विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांनी संबंधीत विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे जसे अर्ज प्राप्त होतील तसे तत्परतेने वेळच्या वेळी पाठवावेत.

जाती पडताळणी समितीकडे प्राप्त झालेल्या विद्यार्थ्यांचे प्रस्ताव समितीने तीन (३) महिन्यांचे आत निकाली काढावेत असे शासनाचे आदेश आहेत.

संदर्भ क्र.३ मध्ये नमूद या याचिकेमध्ये दिलेल्या मा. उच्च न्यायालयाने सर्व महाविद्यालयांना तसेच जात प्रमाणपत्र पडताळणी समिती यांना असे आदेशित केले आहे की, जातीच्या आरक्षणाच्या आधारावर व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश देत असताना ज्या विद्यार्थ्यांचे जात प्रमाणपत्र जात वैधता पडताळणीसाठी जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे प्रलंबित आहेत अशा विद्यार्थ्यांना महाविद्यालयात प्रवेश देण्यात यावा. आरक्षित जागेवर देण्यात आलेला प्रवेश हा विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समितीच्या निर्णयास अधिन राहून असेल.

सबब कनिष्ठ महाविद्यालय /महाविद्यालयात व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्रा अभावी प्रवेश रद्द करु नये व त्यांचा वार्षीक परीक्षेचा निकाल राखून ठेवण्यात येवू नये.आपल्या अधिनस्त सर्व शैक्षणिक संस्थाना वरील प्रमाणे कळविण्यात यावे.

संचालक, समाज कल्याण
महाराष्ट्र राज्य, पुणे -१

प्रत : माहितीस्तव सविनय सादर

१. मा. प्रधान सचिव,तंत्र शिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य,मंत्रालय, मुंबई - ३२
२. मा. प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई -३२